# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**परिपत्रक क्र. ३१८/२०२५**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था/ प्राचार्य/संचालक यांचेमार्फत शैक्षणिक विभाग यांच्याशी संबंधित विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळे/समिती, विद्यापीठाच्या विविध कामकाजासाठी बी.सी.यु.डी. च्या संगणक प्रणालीमधील शिक्षकांच्या माहितीचा वापर करण्यात येत आहे.

उपरोक्त संगणक प्रणालीमध्ये शिक्षकांच्या माहितीच्या अनुषंगाने सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांना कळविण्यात येते की, बी.सी.यु.डी. संगणक प्रणालीमधील सर्व शिक्षकांची माहिती प्रत्येक शैक्षणिक सत्राच्या सुरवातीला अद्ययावत करण्यात यावी. सदर शिक्षकांच्या माहितीमध्ये सेवानिवृत्त/राजीनामा दिलेल्या/बदली झालेल्या अनेक शिक्षकांची माहिती अद्ययावत केलेली नसल्याचे निदर्शनास आलेले आहे.

विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालय/परिसंस्थेतील प्राचार्य/संचालक/अध्यापकांची प्रोफाईल मधील माहिती तसेच त्याच्या विषयासंदर्भातील माहिती महाराष्ट्र शासनाच्या विविध मागणीनुसार सादर करावी लागते. तसेच महाविद्यालयातील/मान्यताप्राप्त परिसंस्थेतील प्राचार्य/संचालक/अध्यापकांच्या प्रोफाईल मधील माहिती अद्ययावत करण्याबाबत यापूर्वीच या कार्यालयाचे परिपत्रक क्र. २१८/२०२४, दि. ०९ सप्टेंबर, २०२४ व परिपत्रक क्र. १३९/२०२५, दि. १८ जून, २०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आले आहे.

सबब, या परिपत्रकाद्वारे विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या सर्व महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्थेतील प्राचार्य/संचालक यांना पुन:श्च एकदा कळविण्यात येते की, विद्यापीठाकडून ज्या अध्यापकांना शिक्षक मान्यता देण्यात आलेल्या आहेत अशाच मान्यताप्राप्त प्राचार्य/संचालक/अध्यापकांची माहिती विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रत्येकवर्षी शैक्षणिक सत्रापूर्वी अद्ययावत करण्यात यावी, त्याचप्रमाणे माहिती अद्ययावत न केल्यास शासन पातळावरील उत्तरदायित्वासाठी ते स्वत: जबाबदार राहतील, याची नोंद घ्यावी.

तसेच जे प्राचार्य/संचालक/अध्यापक नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेले असतील किंवा ज्या प्राचार्य/संचालक/अध्यापकांच्या महाविद्यालयातील/मान्यताप्राप्त परिसंस्थेमध्ये बदल झालेला असेल तसेच अशा विविध कारणाने सदर माहितीमध्ये बदल झाला असेल तर ती माहिती तात्काळ अद्ययावत करणे बंधनकारक आहे, याची कृपया नोंद घ्यावी.

सर्व संबंधित महाविद्यालय/परिसंस्थांचे प्राचार्य/संचालक यांना कळविण्यात येते की, वरील परिपत्रकातील आशय सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावा.

**जावक क्र. सीसीओ/५२०८**
दि. १६/१२/२०२५

**(राजेंद्र द. साळवी)**
**सहायक कुलसचिव**

**प्रत** : मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था